# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


जावक क्र.लेखा/२९/कावि२७९/२०२२ दिनांक :-१६/०९/२०२२

परिपत्रक

विषय:- संगणक प्रणालीव्दारे कामाचा आदेश निर्गत करणेबाबत.

मनपाच्या विविध विभागांमार्फत भांडवली / महसुली ( किरकोळ दुरूस्ती ) कामांचे व वस्तु व सेवा पुरवठादार यांचे कार्यारंभ आदेश निर्गत केले जातात. परंतु सदरची कामे चालू असताना सद्यस्थितीतील दायीत्व तसेच भविष्यातील दायीत्वाची अचूक माहिती प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, त्यामुळे संभाव्य खर्चाचे अचूक नियोजन करणे शकय होत नाही. मनपाच्या दायीत्वाची अचूक माहिती मिळणेकामी सर्व विभागांना सुचीत करण्यात येते की, भांडवली व महसुली ( किरकोळ दुरूस्ती ) कामांचे व वस्तु व सेवा पुरवठादार यांना देणेत येणारे कार्यारंभ आदेश संगणक प्रणालीतूनच तयार करणेत यावेत. त्याकरीता संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ती सुधारणा / बदल ७ दिवसांचे आत माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत आपले विभागाकडून करून घेणेत यावेत व आपल्या विभागाशी संबंधीत असलेली दायीत्वाची संपूर्ण माहिती अद्यावत ठेवणेत यावी. सदर परिपत्रकाची नोंद सर्व संबंधीत विभागांनी घेणेत यावी व सर्व संबंधीत कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे.

( शेखर सिंह )
आयुक्त तथा प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रत:-

सर्व विभाग